# गुणवत्ता, वेळ आणि पारदर्शकतेसाठी भारतीय जनसंसदेचे आंदोलन

## रेशन लाभार्थ्यांना निकृष्ट धान्य नको

**अहमदनगर । रयत समाचार**

रेशन लाभार्थ्यांना योग्य गुणवत्तेचे धान्य मिळावे, रेशन दुकाने पूर्ण वेळ उघडी ठेवावीत, तक्रार पुस्तिका दर्शनी भागात उपलब्ध असाव्यात, तसेच धान्याचे नमुने सीलबंद पारदर्शक पाकिटात ठेवावेत, अशा मागण्या पूर्ण करण्यासाठी भारतीय जनसंसद यांच्या वतीने जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना मागणीपत्र देण्यात आले.



मागणीपत्र देताना भारतीय जनसंसदेचे अशोक सब्बन, कैलास पठारे, सुधीर भद्रे, अशोक भोसले, केशव बर्कते, सुनील टाक, रईस शेख, वीरबहादुर प्रजापती, पोपटराव साठे, बबलू खोसला, बाळासाहेब पालवे, विजय शिरसाट, सुभाष शिंदे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी जिल्हाध्यक्ष सुधीर भद्रे यांनी सांगितले, अनेक वेळा खाण्यास अयोग्य असलेले निकृष्ट धान्य रेशन दुकानांतून वितरित केले जाते. लाभार्थ्यांनी तक्रार केली तरी दुकानदार त्याची दखल घेत नाहीत. प्रत्यक्षात अशा निकृष्ट धान्याचे वितरण होऊच नये, मात्र तसे होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

शहराध्यक्षा रईस शेख यांनी अनेक रेशन दुकाने पूर्ण वेळ उघडी राहत नसल्याने लाभार्थ्यांना वारंवार फेऱ्या माराव्या लागत असल्याचे सांगून, सर्व दुकाने ठरलेल्या वेळेत पूर्ण वेळ सुरू ठेवण्याची मागणी केली.

> बुरूडगाव रोड येथील लाभार्थ्यांसाठी स्टेशन रोडवरील, साखर कारखान्याजवळ असलेल्या रेशन दुकान क्रमांक २५ मधून वितरित करण्यात आलेले निकृष्ट दर्जाचे धान्य प्रत्यक्ष जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांच्या टेबलावर तपासणीसाठी ठेवण्यात आले.

दरम्यान, बुरूडगाव रोड परिसरातील नागरिकांसाठी असलेल्या दुकान क्रमांक २५ मधून निकृष्ट व खाण्यास अयोग्य धान्य दिले जात असल्याचा आरोप भारतीय जनसंसदेचे रेशन विभाग प्रमुख केशव बर्कते यांनी केला. धान्य बदलून देण्याची मागणी केल्यावर दुकानदाराने आरेरावीची भाषा वापरून नकार दिला, तसेच तक्रार पुस्तिका मागितली असता ती उपलब्ध करून देण्यात आली नाही, अशी माहिती त्यांनी दिली. गुणवत्तापूर्ण धान्य वितरण, रेशन दुकाने पूर्ण वेळ सुरू ठेवणे, तक्रार पुस्तिका दर्शनी भागात लावणे, अद्ययावत धान्य नमुने सीलबंद पारदर्शक पाकिटात ठेवणे आणि लाभार्थ्यांशी सौजन्यपूर्ण वर्तन करणे, या प्रमुख मागण्यांसाठी भारतीय जनसंसद यांच्या वतीने जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले.

# वारसा वृक्षाचा बळी; गुलमोहोर रोडवर रस्ता ठेकेदाराची मनमानी?

## ग्रीन बी-ईटरसह पक्ष्यांचा आधिवास धोक्यात



**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या रस्ता कामासाठी नियुक्त ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे शहरातील एक वारसा वृक्ष नष्ट झाल्याची गंभीर घटना गुलमोहोर रोडवर घडली आहे. रा.स्व. संघ भाजपाच्या माजी नगरसेवकांच्या निवासस्थानासमोरील जांभुळ वृक्ष रस्ता रुंदीकरणाच्या नावाखाली ठेकेदाराने तोडून टाकला. या वृक्षावर ग्रीन बी ईटरसह विविध पक्ष्यांचा मोठा अधिवास होता.

हा जांभुळ वृक्ष अनेक दशकांचा असून परिसराची ओळख आणि पर्यावरणीय समतोल राखण्यात त्याची महत्त्वाची भूमिका होती. मात्र कोणतीही पूर्वसूचना, पर्यावरण विभागाची परवानगी किंवा पर्यायी वृक्षारोपणाची तरतूद न करता हा वृक्ष तोडण्यात आल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

घटनास्थळी मोठ्या प्रमाणात फांद्या, बुंधा आणि मुळे रस्त्यावर पडलेली असून, यामुळे वाहतुकीलाही अडथळा निर्माण झाला. स्थानिक नागरिकांनी याला विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा बळी अशी तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. नागरिकांनी संबंधित ठेकेदारासह जबाबदार अधिकाऱ्यांवर तत्काळ कारवाई, तसेच पर्यावरण हानीबद्दल दंड आकारून पर्यायी वृक्षारोपण करण्याची मागणी केली आहे. महानगरपालिकेने याबाबत तातडीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी परिसरातून होत आहे.

# नेत्ररुग्णांचे छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यासमोर निदर्शने

## मोतीबिंदू व पडदा शस्त्रक्रिया जन आरोग्य योजनेत समाविष्ट करण्याची मागणी

**अहमदनगर । रयत समाचार**

ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील नागरिकांसाठी डोळ्यांच्या आजारांवरील उपचार परवडणारे व्हावेत, यासाठी मोतीबिंदू व डोळ्याच्या पडद्याच्या शस्त्रक्रिया महात्मा फुले जन आरोग्य योजनेत तातडीने समाविष्ट कराव्यात, या मागणीसाठी मोतीबिंदू व पडद्याच्या शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर निदर्शने केली.



या आंदोलनात नेत्रदूत जालिंदर बोरुडे यांच्यासह मोतीबिंदू शस्त्रक्रिया करून नुकतेच शहरात परतलेले अनेक ज्येष्ठ नागरिक सहभागी झाले होते. महात्मा फुले जन आरोग्य योजनेत सध्या तब्बल १५०० पेक्षा अधिक आजार व शस्त्रक्रिया समाविष्ट असतानाही, मोतीबिंदू व पडद्याच्या शस्त्रक्रिया अद्यापही योजनेबाहेर असल्याने ग्रामीण भागातील रुग्णांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे आंदोलकांनी सांगितले.

जालिंदर बोरुडे म्हणाले की, ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात रुग्णांना मोतीबिंदू किंवा डोळ्याच्या पडद्याच्या शस्त्रक्रियेची तातडीने गरज भासत आहे. मात्र या शस्त्रक्रियांचा खर्च २० हजार ते ८० हजार रुपयांपर्यंत जात असल्याने आर्थिक दुर्बल रुग्णांसाठी उपचार करणे अशक्य होत आहे. आर्थिक अडचणींमुळे अनेक रुग्ण शस्त्रक्रिया टाळतात किंवा उशिरा करतात. परिणामी वेळेवर उपचार न झाल्याने काही रुग्णांना कायमचे अंधत्व आले असल्याची गंभीर बाब निदर्शनास आणून दिली.

बोरुडे म्हणाले की, खासगी रुग्णालये या शस्त्रक्रिया महात्मा फुले जन आरोग्य योजनेच्या बाहेर असल्याने रुग्णांकडून थेट मोठी रक्कम वसूल केली जाते. सर्वसामान्य व गोर-गरीब रुग्णांना एवढा खर्च परवडणारा नाही, ही अत्यंत चिंताजनक स्थिती आहे. काही सामाजिक संस्था व मंडळे मोफत नेत्र तपासणी शिबिरे किंवा अंशतः आर्थिक मदत करून रुग्णांना मदत करत असल्या तरी, रुग्णसंख्येच्या तुलनेत ही मदत अत्यंत अपुरी असल्याचे त्यांनी सांगितले. मोतीबिंदू हा भारतातील सर्वाधिक सामान्य नेत्रविकार असून, वेळेवर शस्त्रक्रिया न झाल्यास दृष्टिदोषाचा धोका वाढतो. त्यामुळे मोतीबिंदू व पडद्याच्या शस्त्रक्रिया शासनाच्या महात्मा फुले जन आरोग्य योजनेत समाविष्ट करून त्या मोफत किंवा अत्यल्प दरात उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी त्यांनी केली.

# मनपा निवडणुक आचारसंहिता कक्षाची स्थापना

## शेळके, बल्लाळ, शेख सहाय्यक अधिकारी नियुक्त

**अहमदनगर । रयत समाचार**

राज्य निवडणूक आयोगाने अहिल्यानगर महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यामुळे अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्रात आचारसंहिता लागू झाली आहे. निवडणूक काळात आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होऊ नये, यासाठी प्रशासनाकडून उपाययोजना करण्यात येत आहेत. त्याच अनुषंगाने नागरिकांना आचारसंहितेचे उल्लंघन होत असल्याबाबत माहिती व तक्रार देण्यासाठी आचारसंहिता कक्ष स्थापन करण्यात आला आहे. त्यासाठी उपजिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी तथा आयुक्त यशवंत डांगे यांनी दिली.



अहिल्यानगर महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील सभागृह नेता यांच्या दालनात आचारसंहिता कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षाच्या प्रमुख म्हणून उपजिल्हाधिकारी श्रीमती सायली अशोक सोळंके (मोबाईल क्रमांक ७०३८१७२७८५) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच, त्यांना सहाय्यक म्हणून नगररचना विभागाचे रचना सहाय्यक जितेंद्र शेळके (मोबाईल क्रमांक ९९२२७७७११६), अतिक्रमण निर्मूलन विभाग प्रमुख आदित्य बल्लाळ (मोबाईल क्रमांक ९५६१००४६१८), क्षेत्रीय अधिकारी रिझवान शेख (मोबाईल क्रमांक ९८२२६५२७८२) यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. निवडणुकीची आचारसंहिता निवडणूक कार्यक्रम जाहीर केलेल्या वेळेपासून व दिनांकापासून लागू झाली आहे. निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत आचारसंहिता अंमलात राहील. ही आचारसंहिता महानगरपालिकेच्या संपूर्ण क्षेत्रात लागू राहील. या क्षेत्रातील मतदारांवर प्रलोभन देणारी कोणतीही कृती अथवा घोषणा कोणत्याही मंत्री, खासदार, आमदार, नगरसेवक, इतर पदाधिकाऱ्यांना किंवा शासनाच्या विभागाला इतरत्र सुध्दा करता येणार नाही, असे राज्य निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे महानगरपालिका क्षेत्रात आदर्श आचारसंहितेची कठोर अंमलबजावणी केली जाणार असल्याचे मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी तथा आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.

# ब्राह्मण सेवा संघाकडून दंडक्रम पारायणकर्ते रेखे यांचा सत्कार

**अहमदनगर । रयत समाचार**

ब्राह्मण सेवा संघ, केडगाव यांच्या वतीने अतिशय अवघड व दुर्मिळ असे दंडक्रम पारायण पूर्ण करणारे देवव्रत महेश रेखे यांचा सत्कार व अभिनंदन करण्यात आले. नगरचे वेदमूर्ती महेश रेखे यांचे सुपुत्र असलेल्या विक्रमादित्य यांनी पुण्यभूमी काशी येथे दंडक्रम पारायण करून एक ऐतिहासिक विक्रम साध्य केला.



या कार्याची दखल जगभरातून घेतली जात असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह विविध स्तरांतील मान्यवरांनी कौतुक केले. या कार्याबद्दल काशी नगरीत धन्य पितापुत्रांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. अहिल्यानगरसाठी हा अत्यंत अभिमानाचा क्षण असल्याची भावना व्यक्त करत ब्राह्मण सेवा संघाचे अध्यक्ष नंदकुमार पोळ यांनी रेखे यांच्या कार्याचे विशेष कौतुक केले. यावेळी ॲड. उमेश नगरकर, ज्ञानेश देशपांडे, अजित कुलकर्णी, महेश कुलकर्णी, पंकज जहागीरदार, आनंद ठिपसे, किरण कुलकर्णी, राहुल पांडव, विनायक कुलकर्णी, नितीन क्षीरसागर, राकेश राव, हभप स्वानंद महाराज जोशी आदि मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल

आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक




निसार Art

सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट

7020356335 | 9860830016

पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!

कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द

जगदंबा टी सेंटर

चहा, कॉफी, लेमन टी

शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर

शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर

प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे

97655 58585

दैनिक रयत समाचार

अहमदनगर जिल्हा आवृत्तीसाठी...

त्वरित नियुक्त करणे आहेत

१४ तालुका प्रतिनिधी, १४ शहर प्रतिनिधी, १५ प्रेस फोटोग्राफर, १४ तालुक्यात किमान ५ ते ७ ग्रामीण वार्ताहर.

अनुभवींना प्राधान्य!

इच्छुकांनी जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर सात दिवसाच्या आत मानधनाच्या अपेक्षेसह मा. संपादक यांच्या नावे अर्ज करावा अर्ज या क्रमांकावर व्हॉटसअप करावा : 8805401800

आम्ही काय देणार

* पत्रकार म्हणून निवड झाल्यानंतर नियुक्तीपत्र, (Appointment letter) दैनिकाचे ओळखपत्र (PRESS I. Card)

एकाच वेळी प्रिंट व डिजिटल मिडियात काम करण्याची संधी.

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

दैनिक रयत समाचारचा ख्रिसमस विशेषांक

गुरूवार, ता.२५ डिसेंबर रोजी प्रसिद्ध होत आहे

ख्रिसमस विशेषांक

अंकासाठी लेख, माहिती, जाहीराती पाठवाव्यात

अतिथी संपादक
सॅम्युअल वाघमारे
8788412780

संपादक
भैरवनाथ वाकळे
8805401800

रयत समाचार महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक

जाहीरात पाठविण्यासाठी संपर्क क्रमांक

भैरवनाथ- ८८०५४०१८००, दिपक- ७७७४००१८००,
तुषार- ७९७२३४४४७४, पंकज-९८२२४९६६६४

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# बिबट हल्ल्यात जखमी राजवीर कोतकर याला ५ लाखांची मदत



**नगरतालुका । रयत समाचार**

बिबट्याच्या हल्ल्यात ता. १७ डिसेंबर २०२५ रोजी जखमी झालेल्या राजवीर रामकिसन कोतकर याला वन विभागाकडून तातडीची मदत म्हणून पाच लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला. सदर मदत वन विभागाच्या वतीने तत्काळ उपलब्ध करून देण्यात आली. या मदत प्रक्रियेत इसळक गावच्या सरपंच छाया गेरंगे तसेच संजय गेरंगे यांचे वेळोवेळी मोलाचे सहकार्य लाभले. धनादेश वितरणाच्या वेळी वन विभागाच्या अश्विनी दिघे, अविनाश तेलोरे, नितीन गायकवाड, सुनील धोत्रे यांच्यासह सरपंच छाया गेरंगे व संजय गेरंगे उपस्थित होते. गेरंगे यांच्या हस्ते जखमी राजवीर कोतकर याला धनादेश सुपूर्द करण्यात आला. यावेळी कोतकर कुटुंबीयांनी सरपंच छाया गेरंगे तसेच वन विभागाचे आभार मानले.

# सावित्री ज्योती महोत्सव पुढे ढकलला; १७ जानेवारीला उद्घाटन

**अहमदनगर रयत समाचार**

महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बचत गटांचे प्रदर्शन-विक्री, युवा महोत्सव, विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांचा समावेश असलेल्या चार दिवसीय सावित्री ज्योती महोत्सवाची तारीख दोन दिवस पुढे ढकलण्यात आली आहे. हा महोत्सव आता गुलमोहर रोडवरील कोहिनूर मंगल कार्यालय, सावेडी येथे ता. १७ ते २० जानेवारी दरम्यान होणार असल्याची माहिती महोत्सवाचे मुख्य संयोजक, जय युवा अकॅडमीचे संस्थापक अध्यक्ष ॲड. महेश शिंदे व विशेष सरकारी वकील ॲड. सुरेश लगड यांनी दिली. ता. १५ जानेवारी रोजी मतदान व १६ जानेवारी रोजी मतमोजणी होणार असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. अहिल्यानगर महानगरपालिका, जय स्वयंसेवी संस्था संघटना, क्रीडा कार्यालय, मेरा युवा भारत यांच्या सहकार्याने हा महोत्सव आयोजित करण्यात येत आहे. यंदाचे हे महोत्सवाचे दहावे वर्ष आहे. महोत्सवात मोफत आरोग्य तपासणी शिबिर, रक्तदान शिबिर, दंत तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर, सर्व जातीय वधू-वर मेळावा, वक्तृत्व, नृत्य, चित्रकला, उखाणा, भजन व हस्ताक्षर स्पर्धा, विविध सांस्कृतिक कार्यक्रम, ब्युटी टॅलेंट शो, सामाजिक संस्थांसाठी मार्गदर्शन, बेटी बचाव बेटी पढाव, आहार मार्गदर्शन, सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर व्याख्यान, राष्ट्रीय युवा सप्ताह, स्वामी विवेकानंद जयंती, सावित्री ज्योती गौरव पुरस्कार, कवी संमेलन व लोककला सादरीकरण असे भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

# 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी 'काल आणि आज' विषयावर युवा परिषद उत्साहात संपन्न



**रत्नागिरी । रयत समाचार**

१४ डिसेंबर रोजी स्पंदन समतेचे ग्रुप, रत्नागिरी यांच्या वतीने पीपल्स एज्युकेशन सोसायटी : काल आणि आज या विषयावर आयोजित युवा परिषद यशस्वीरीत्या पार पडली. या परिषदेकरिता पीईएस अभियांत्रिकी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर डॉ. राहुल ब्राह्मणे यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाला रत्नागिरी जिल्ह्यातील अभ्यासू, विद्वान व जिज्ञासू युवक युवतींसह ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. डॉ. राहुल ब्राह्मणे यांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या स्थापनेपासून ते आजपर्यंतच्या वाटचालीचा सखोल, वस्तुनिष्ठ व प्रेरणादायी आढावा घेतला. संस्थेची ऐतिहासिक पार्श्वभूमी, शिक्षण क्षेत्रातील भरीव योगदान आणि सद्यस्थिती याबाबत त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी आयोजित प्रश्नोत्तर सत्रात उपस्थितांनी विविध विषयांवर मनमोकळे प्रश्न उपस्थित केले. या सर्व प्रश्नांना डॉ. ब्राह्मणे यांनी स्पष्ट, समर्पक व मार्गदर्शक उत्तरे देत शंकांचे निरसन केले. परिषदेचा महत्त्वाचा सकारात्मक निष्कर्ष म्हणजे कोकण- रत्नागिरी परिसरात पीईएसच्या शाळा व महाविद्यालये सुरू करण्याबाबत अनेकांनी ठाम भूमिका व्यक्त केली. तसेच कोकणातील इतर जिल्हे व तालुका स्तरावरही अशा वैचारिक कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा संकल्प व्यक्त करत उपस्थितांनी निमंत्रणे दिली. कार्यक्रमाचे आयोजन संदेश कांबळे, निहाल हाथखांबेकर आणि त्यांच्या स्पंदन समतेचे ग्रुप यांनी अत्यंत शिस्तबद्ध, नियोजनबद्ध व प्रभावी पद्धतीने करून परिषद यशस्वी केली.

मराठी टीव्हीवरील हिट मालिका

# 'आई कुठे काय करते' पुन्हा प्रेक्षकांच्या भेटीला



**मुंबई । प्रतिनिधी**

मराठी टेलिव्हिजनवरील सर्वाधिक लोकप्रिय ठरलेली मालिका 'आई कुठे काय करते' पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. तब्बल पाच वर्षे प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या या मालिकेने वर्षभरापूर्वी निरोप घेतला होता. मात्र, चाहत्यांच्या सततच्या मागणीनंतर आता ही मालिका पुन्हा प्रसारित होणार असल्याची अधिकृत माहिती समोर आली आहे. ही मालिका २२ डिसेंबरपासून सोमवार ते शनिवार संध्याकाळी ७ वाजता प्रसारित होणार आहे. विशेष म्हणजे यावेळी ही मालिका स्टार प्रवाहवर नव्हे, तर 'प्रवाह पिक्चर' या वाहिनीवर दाखवली जाणार आहे. प्रवाह पिक्चरच्या अधिकृत सोशल मीडिया पेजवर मालिकेचा जुना प्रोमो शेअर करत ही घोषणा करण्यात आली. 'आई कुठे काय करते' ही मालिका अरुंधती देशमुख आणि तिच्या कुटुंबाभोवती फिरणाऱ्या कथानकामुळे घराघरात पोहोचली होती. अभिनेत्री मधुराणी प्रभुलकर यांनी साकारलेली अरुंधतीची भूमिका विशेष गाजली. तसेच मिलिंद गवळी (अनिरुद्ध) आणि रुपाली भोसले (संजना) या कलाकारांच्या भूमिका प्रेक्षकांच्या विशेष लक्षात राहिल्या. या मालिकेत अरुंधती, अनिरुद्ध, संजना, आप्पा, आई, अभिषेक, यश, ईशा अशा अनेक पात्रांनी प्रेक्षकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले होते.

मालिका पुन्हा सुरू होत असल्याची बातमी समजताच सोशल मीडियावर चाहत्यांनी आनंद व्यक्त केला आहे. दरम्यान, या मालिकेतील प्रमुख कलाकार सध्या इतर मालिकांमधूनही प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत. मात्र 'आई कुठे काय करते'च्या पुनरागमनामुळे पुन्हा एकदा मराठी टीव्हीविश्वात उत्साहाचं वातावरण निर्माण झालं आहे.

# कैबुकाई कराटे चॅम्पियनशिपमध्ये साक्षी थिटे यांनी पटकावले सुवर्णपदक



**अहमदनगर । रयत समाचार**

बोल्हेगाव येथील आदेश लॉन येथे आयोजित दुसरी ओपन अहिल्यानगर कैबुकाई कराटे चॅम्पियनशिप २०२५ ही जिल्हास्तरीय स्पर्धा रविवारी ता. १४ डिसेंबर रोजी उत्साहात पार पडली. या स्पर्धेत साक्षी अरुण थिटे हिने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत सुवर्णपदक पटकावले. स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी नगरसेवक योगिराज गाडे, मदन आढाव, शिहान शिरीष तळेकर तसेच बाल कलाकार श्रीशा अकडकर आदी मान्यवर उपस्थित होते.

मुंबई, पुणे व अहिल्यानगर जिल्ह्यातून आलेल्या सुमारे ३०० स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला. बक्षीस वितरण समारंभाला माजी नगरसेवक कुमार वाकळे, शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या कोमल वाकळे पाटील तसेच रिलस्टार आकाश मुसळे यांची प्रमुख उपस्थिती होती. स्पर्धेचे आयोजन अमित बडदे यांनी केले होते, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निलेश मंचरकर यांनी केले.

कार्यक्रमास बोल्हेगाव स्पोर्टस् क्लबचे खेळाडू व पदाधिकारी सागर कोलते, तुषार कोलते, किशोर बामदळे, गणेश कळमकर, अतुल देठे, वैभव आंधळे, काका रोहकले, संदीप कोलते, भाऊ कापडे, पिंटू गायगवाड, सचिन उजागरे, अंबादास शिंदे, डॉ. बाळासाहेब मेने यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यशाबद्दल साक्षी अरुण थिटे हिचे सर्वत्र अभिनंदन होत असून, तिच्या पुढील वाटचालीसाठी क्रीडाप्रेमींनी शुभेच्छांचा वर्षाव केला.

# विविध गुणदर्शन स्पर्धेत कोल्हार शाळेचे घवघवीत यश



**कोल्हार । सलीमखान पठाण**

अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या विविध गुणदर्शन स्पर्धांमध्ये कोल्हार भगवतीपूर येथील शाळेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. केंद्रस्तरावर पार पडलेल्या या स्पर्धांमध्ये शाळेतील सहा विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावून तालुकास्तरीय स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली आहे. शाळा व केंद्र स्तरावर मिळालेले यश पुढीलप्रमाणे: किलबिल गट हस्ताक्षर स्पर्धेत प्रेरणा अमोल बोरुडे हिने शाळा व केंद्र स्तरावर प्रथम क्रमांक पटकावला. शाळा स्तरावर प्रांजल प्रमोद लोखंडे द्वितीय, तर आकांक्षा गणेश थोरात व आयेशा सलीम शेख यांनी तृतीय क्रमांक मिळविला. बालगट हस्ताक्षर स्पर्धेत शिव योगेश अंत्रे प्रथम, सार्थक राजेंद्र गायकवाड द्वितीय व तेजस्विनी सनी शेंडगे तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले. वक्तृत्व स्पर्धेत किलबिल गटातून अलशिफा सलीम शेख हिने शाळा व केंद्र स्तरावर प्रथम क्रमांक मिळविला. शाळा स्तरावर आयेशा सलीम शेख द्वितीय, महेक सोईफ तांबोळी तृतीय ठरली. बालगट वक्तृत्व स्पर्धेत गितेश पुंडलिक महाले याने शाळा स्तरावर प्रथम व केंद्र स्तरावर तृतीय क्रमांक मिळविला. शाळा स्तरावर संस्कार सोमनाथ सरोदे द्वितीय, अर्पिता नानासाहेब चव्हाण तृतीय ठरली. कथा सादरीकरण स्पर्धेत बालगटातून तनुजा गणेश कदम हिने शाळा स्तरावर प्रथम व केंद्र स्तरावर द्वितीय क्रमांक मिळविला. शाळा स्तरावर नूर फातिमा पया शेख द्वितीय व चैतन्य एकनाथ जमधडे तृतीय ठरले. वेशभूषा सादरीकरण स्पर्धेत किलबिल गटातून अद्विक संतोष गिते याने शाळा स्तरावर प्रथम व केंद्र स्तरावर तृतीय क्रमांक मिळविला. शाळा स्तरावर रफत अमर शेख द्वितीय, माहेरा अजिम शेख तृतीय ठरली. बालगट वेशभूषा स्पर्धेत फातिमा पया शेख हिने शाळा स्तरावर प्रथम, काव्या संतोष बोऱ्हाडे द्वितीय व गौरी योगेश गिते तृतीय क्रमांक पटकावला. वैयक्तिक गीतगायन स्पर्धेत शुभम अमोल बोरुडे याने शाळा स्तरावर प्रथम व केंद्र स्तरावर तृतीय क्रमांक मिळविला. शाळा स्तरावर पूजा सूरज उमाप द्वितीय, आर्या समाधान मानकर तृतीय ठरली. अन्य गटात काव्या संतोष बोऱ्हाडे प्रथम, आराध्या दीपक राजभोज द्वितीय व तनुजा गणेश कदम तृतीय ठरली. तसेच शाळा स्तरावरील सांस्कृतिक कार्यक्रमांत 'स्वर्गात आकाशगंगा' या समूह नृत्याचे व 'जगी घुमवा वारे' या समूहगीताचे उत्कृष्ट सादरीकरण करण्यात आले. या सर्व विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक साहेबराव अनाप, वर्गशिक्षक सविता कडलग, राजेंद्र बोकंद, हौशीनाथ सजन, विद्या उदावंत, मनिषा शिंदे, शीतल देशमुख, लता गाडेकर, रूपाली नाईक व पुंडलिक महाले यांचे मार्गदर्शन लाभले. तालुकास्तरावर निवड झालेल्या व सहभागी विद्यार्थ्यांचे राहाता तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी राजेश पावसे, विस्तार अधिकारी विष्णू कांबळे, ॲड. सुरेंद्र पाटील खर्डे, डॉ. भास्कर खर्डे, भाऊसाहेब खर्डे, केंद्रप्रमुख कानिफनाथ कोळेकर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष विजय बोरुडे, उपाध्यक्ष श्याम गोसावी, शिक्षणतज्ज्ञ, सांस्कृतिक समितीचे पदाधिकारी, पालक व ग्रामस्थांनी कौतुक करत तालुकास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# किशोरवय हा आयुष्यातील अत्यंत संवेदनशील टप्पा- महेश पाडेकर

**भंडारदरा । रयत समाचार**

शेंडी येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत आयोजित विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिरात मानसशास्त्र विषयाचे अभ्यासक व अनुभवी समुपदेशक महेश पाडेकर यांनी ''किशोरवयीन मुलांच्या समस्या व उपाययोजना'' या विषयावर प्रभावी व मार्गदर्शक व्याख्यान दिले. किशोरवयात उद्भवणारे मानसिक गोंधळ, न्यूनगंड, व्यसनांचे आकर्षण, मोबाईलचे वाढते व्यसन, अभ्यासातील उदासीनता, पालक व विद्यार्थी यांच्यातील संवादातील दरी, आत्मविश्वासाचा अभाव आदी अनेक वास्तव समस्यांचा त्यांनी सखोल व उदाहरणांसह उलगडा केला. विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत अनुभवकथन व कृतीयुक्त उदाहरणांच्या माध्यमातून आत्मसन्मान, सकारात्मक विचारसरणी आणि योग्य निर्णयक्षमता कशी विकसित करावी, याचे त्यांनी प्रभावी मार्गदर्शन केले. ''किशोरवय हा आयुष्यातील अत्यंत संवेदनशील टप्पा असून योग्य वेळी योग्य मार्गदर्शन मिळाल्यास विद्यार्थी घडतो, अन्यथा तो भरकटतो,'' असे मत महेश पाडेकर यांनी व्यक्त केले. व्यसनांपासून दूर राहण्यासाठी आत्मनियंत्रण, ध्येय निश्चिती तसेच शिक्षक, पालक, विद्यार्थी यांच्यातील संवाद किती आवश्यक आहे, यावरही त्यांनी भर दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य दिलीप रोंगटे होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी अशा मार्गदर्शक व्याख्यानांमुळे विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा मिळते, असे मत व्यक्त केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी संदीप महाडदेव व सहकार्यक्रमाधिकारी राजेंद्र चव्हाण यांनी शिबिराच्या उद्दिष्टांची माहिती देत विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शनाचा जीवनात उपयोग करावा, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मदने या विद्यार्थिनीने प्रभावीपणे केले, तर आभार प्रदर्शन खाडे या विद्यार्थ्याने केले. या व्याख्यानामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, समाजभान व सकारात्मक जीवनदृष्टी निर्माण झाल्याची प्रतिक्रिया उपस्थित शिक्षक व स्वयंसेवकांनी व्यक्त केली.

# अल्पसंख्यांक हक्क दिन एक मागोवा



१८ डिसेंबर रोजी जगात अल्पसंख्यांक हक्क दिन साजरा करण्याचा सोपस्कार पार पाडण्यात येणार आहे. या दिनासंदर्भात बहुसंख्य तर सोडा स्वतः अल्पसंख्यांकांना सुद्धा फारशी माहिती नाही. हा दिन साजरा केल्याने होत जात काही नाही परंतु कमीत कमी हा दिन का साजरा केला जातो? भारतात अल्पसंख्यांक कोण? त्यांची स्थिती काय? त्यांच्याविषयी सरकारचे धोरण कोणते? त्यांच्याबद्दल बहुसंख्य समाजाचा दृष्टीकोण काय? या संबंधी चार शब्द वाचकांच्या डोळ्यासमोरून जावेत म्हणून हा लेखन प्रपंच. अल्पसंख्यांक आयोग कायदा १९९२ च्या कलम २ (क) प्रमाणे भारतात मुस्लिम, शीख, जैन आणि पारसी समुदायाला अल्पसंख्याक म्हटले जाते. त्यांच्या कल्याणासाठी केंद्रात अल्पसंख्यांक कल्याण मंत्रालय नावाचे एक नाममात्र मंत्रालय आहे. या मंत्रालयाची अल्पसंख्याकांच्या कल्याणाविषयीची भूमिका, तळमळ आणि कार्य हा फार किचकट विषय असल्याने तो तूर्त सोडून अल्पसंख्याक हक्क दिवस यावर फोकस करूया. भारतीय राज्यघटनेमध्ये सुद्धा अल्पसंख्याक समाजाच्या कल्याणासाठी खालीलप्रमाणे तरतूद करण्यात आलेली आहे. अनुच्छेद २५ मध्ये सर्वच नागरिकांना धार्मिक स्वातंत्र्य प्रदान करण्यात आलेले आहेत. त्यात अल्पसंख्याकांचा सुद्धा समावेश आहे, हे ओघानेच आले. त्यामुळे अल्पसंख्याक समुदाय आपल्या धर्माचे पालन करू शकतो. त्याचा प्रचार आणि प्रसार करू शकतो.

अल्पसंख्यांकांच्या भाषा, त्यांची लिपी आणि संस्कृतीचे संरक्षण करण्याचा त्यांना अधिकार मिळालेला आहे. अल्पसंख्यांक समाजाला आपल्या स्वतंत्र शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा आणि त्या चालविण्याचा अधिकार आहे. दिल्लीच्या जामिया मिलिया इस्लामिया व अलिगढ मुस्लिम विद्यापीठासह देशात हजारोंच्या संख्येत असलेले अरबी मदरसे, उर्दू भाषेतून शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्था ह्यांना घटनात्मक संरक्षण मिळालेले आहे. या संस्थांमध्ये अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी विशेष आरक्षण प्राप्त आहे. शिवाय, अरबी मदरसे वगळता इतर शैक्षणिक संस्थांना सरकारतर्फे वित्तीय सहाय्य सुद्धा दिले जाते. खरे पाहता हा अधिकार इतका मोठा अधिकार आहे की, स्वातंत्र्यानंतर या अधिकाराचा वापर करून मुस्लिम समाज आपली शैक्षणिक, नैतिक आणि भौतिक स्थिती दैदिप्यमान करू शकला असता. परंतु दुर्दैवाने लघुदृष्टी असलेले मुस्लिम नेतृत्व आणि शिक्षणाविषयी असलेली नकारात्मकता या दोन कारणांमुळे मुस्लिम समाज हा शैक्षणिक आणि भौतिकदृष्ट्या इतर समाजाच्या तुलनेत कित्येक योजने मागे पडलेला आहे.

एकीकृत बालविकास सेवांची समुचित उपलब्धता, अल्पसंख्यांकांच्या शिक्षणासाठी शैक्षणिक उपलब्धता, सुधारणा अंतर्गत सर्व शिक्षा अभियान आणि कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय योजना, उर्दू शिक्षणासाठी संसाधनांची उपलब्धता, मदरसा शिक्षणाचे आधुनिकीकरण, अल्पसंख्यांक समुदायाच्या हुशार विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, मौलाना आझाद शिक्षण प्रतिष्ठानाच्या माध्यमातून शैक्षणिक सुविधांच्या उपलब्धतेचा विकास, गरीब अल्पसंख्यांकांसाठी मजुरी रोजगार योजना, व तांत्रिक शिक्षणाच्या माध्यमातून कौशल्य विकास योजना, अल्पसंख्यांकांच्या विकासासाठी आर्थिक कर्ज सहाय्यता, केंद्र आणि राज्याच्या नोकऱ्यांमध्ये भरती, ग्रामीण आवास योजनेमध्ये योग्य भागीदारी, अल्पसंख्यांक समुदायाच्या गलिच्छ वस्तींमध्ये सुधार योजना, जातीय घटनांना रोखण्यासाठी उपाययोजना, जातीय स्वरूपाच्या गुन्ह्यांमध्ये अभियोजन, सांप्रदायिक दंगलीमधील पीडित अल्पसंख्यांक समुदायाचे पुनर्वसन. या १५ कलमी कार्यक्रमाचे वैशिष्ट्ये असे की, ही इतर सरकारी योजनांप्रमाणे योजना नव्हती तर हिचे नेतृत्व पंतप्रधान कार्यालय करत होते आणि प्रत्येक जिल्हाधिकाऱ्याला या संदर्भात प्रत्येक महिन्यात बैठक घेऊन केलेल्या कामाचा प्रगती अहवाल पंतप्रधान कार्यालयाला पाठविणे अनिवार्य होते. जिल्हास्तरावर यात मुस्लिम प्रतिनिधी सुद्धा घेणे अनिवार्य होते. परंतु भाजपच नव्हे तर काँग्रेसच्या काळात सुद्धा या योजनेचा इतका जबरदस्त फज्जा उडाला की त्याचे दूसरे उदाहरण मिळणे दुरापास्त आहे. एनएमडीएफसी अर्थात नॅशनल मायनॉरिटीज डेव्हलपमेंट अँड फायनान्स कार्पोरेशन, एवढे लांबलाचक नाव असलेल्या या कार्पोरेशनची स्थापना ३० सप्टेंबर १९९४ रोजी करण्यात आली. सदरचे कार्पोरेशन हे कंपनीज ॲक्ट १९५६ च्या कलम २५ अंतर्गत रजिस्टर्ड असून दरवर्षी केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पामध्ये या कार्पोरेशनला कोट्यावधी रूपयाचा निधी देण्यात येतो. परंतु या कार्पोरेशनतर्फे आर्थिक मदत मिळालेला मुस्लिम व्यक्ती मला तरी आढळून आलेला नाही. याशिवाय अनेक वित्तीय संस्था देशाच्या इतर राज्यात असून, महाराष्ट्रात मौलाना अबुल कलाम आझाद आर्थिक विकास महामंडळ नावाचे महामंडळ अस्तित्वात असून, त्याचीही अवस्था असून नसल्यासारखी आहे. थोडक्यात योजना अनेक, आयोग अनेक, वित्तीय संस्था अनेक परंतु लाभ नाममात्र, अशी एकंदरित अल्पसंख्यांकांची अवस्था आहे. अल्पसंख्याकांशी पावलोपावली भेदभाव केला जातो. त्यांना बहुसंख्याकांच्या वस्तीमध्ये भाड्याने घरे मिळत नाहीत. त्यांना गरज असतांनाही आरक्षण मिळत नाही. अल्पसंख्यांक मंत्रालयाला एक तर निधी दिला जात नाही, दिला तरी तो त्यांच्या विकासावर खर्च केला जाणार नाही. शिक्षणामध्ये कायम डावलले जाते. राष्ट्रीय माध्यमांवरून अहोरात्र त्यांची बदनामी केली जाते. त्यांच्या राष्ट्रनिष्ठेवर कायम संशय घेतला जातो. त्या माध्यमातून त्यांचे मानसिक खच्चीकरण केले जाते. अल्पसंख्यांक दिवस तेव्हाच साजरा होईल जेव्हा त्यांना त्यांचे हक्क खऱ्या अर्थाने बहाल होतील.

**प्रा. इकबाल काकर**
श्रीरामपूर, ९२७०४६४६१६